आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या ७ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरण आढाव्यात सलग दहाव्यांदा रेपो दर साडेसहा टक्क्यांवर कायम

- रत्नागिरी जिल्ह्यातल्या ५ नव्याने सुशोभित स्थानकांचं सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीच्या दहा उमेदवारांची यादी जाहीर

**आणि**

- महिलांच्या टी२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना श्रीलंकेसोबत होणार

**<><><><><>**

**महाराष्ट्रात दहा वैद्यकीय** महाविद्यालयं स्थापन होणं हा लाखो लोकांचं भलं करण्यासाठीचा महायज्ञ आहे, यामुळे राज्यातल्या युवकांसाठी नव्या संधीची दारं उघडतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यातल्या सात हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पायाभरणी केली. तसंच

राज्यातल्या नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्राच्या इतिहासात आतापर्यंत इतक्या वेगाने आणि व्यापक स्तरावर कधीच विकास झाला नाही, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. आगामी विधानसभा निवडणुकीत एकजूट होऊन भाजपा आणि महायुतीला मतदान करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

**राज्यातल्या** दहा वैद्यकीय महाविद्यालयं आणि विकास प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांनी केली. ही महाविद्यालयं मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोली इथं सुरु होणार आहेत. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० ने वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष चार हजार ८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार आहेत. नागपूर आणि शिर्डी विमानतळ इथल्या कामांचं भूमीपूजन तसंच भारतीय कौशल्य संस्था आणि विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

**नागपूर विमानतळामुळे** विदर्भ आंतरराष्ट्रीय व्यापाराचं केंद्र होईल, परकीय गुंतवणूक वाढेल तसंच रोजगार निर्माण होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. **तर महाराष्ट्रात** दहा वैद्यकीय महाविद्यालयं सुरु होणं गौरवास्पद असून आपण विकसित भारताकडे वाटचाल करत आहोत, असं उपमुख्यमं्त्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून लाओसमधल्या व्हिएन्टिनच्या दोन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान मोदी एकविसाव्या आसियान-भारत शिखर परिषदेला आणि एकोणिसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेला उपस्थित राहतील. या शिखर परिषदेच्या दरम्यान प्रधानमंत्री काही द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

देशभरात पारंपरिक औषधांची उपलब्धता वाढवण्यासाठी आयुर्वेद औषध निर्मिती उद्योगात तरुणांनी सहभाग घेणं गरजेचं असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या ८व्या वर्धापन दिनानिमित्त त्या नवी दिल्ली इथं बोलत होत्या. आयुर्वैदिक महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेच्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा आज जाहीर झाला. व्याजदरात कोणतेही बदल न करण्याचा निर्णय बँकेनं सलग १०व्या आढाव्यात घेतला आहे. त्यामुळे रेपो दर साडेसहा टक्क्यांवर, स्टँडींग डिपॉझिट फॅसिलिटी दर सव्वा सहा टक्क्यांवर आणि मार्जिनल डिपॉझिट फॅसिलिटी दर पावणे सात टक्क्यांवर कायम आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण विषयक समितीची बैठक गेल्या सोमवारपासून मुंबईत झाली. त्या नंतर हा आढावा जाहीर करण्यात आला आहे. यावेळच्या चलनविषयक धोरणात चलन फुगवट्याबाबत सध्या तटस्थ भूमिका स्वीकारण्याचा निर्णयही

पतधोरण समितीने घेतला. किरकोळ चलनफुगवट्याचा दर चार टक्के पर्यंत रोखण्याच्या दृष्टीनं आणि विकासाला पाठबळ देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेतल्याचं समितीने म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढ ६ पूर्णांक सात टक्के राहिला, मात्र पूर्ण वर्षासाठी जीडीपी दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज आढाव्यात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीची पुढची बैठक येत्या ४ ते ६ डिसेंबर दरम्यान होणार आहे.

**<><><><><>**

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागानं सुशोभीकरण केलेल्या रत्नागिरी रेल्वे स्थानकाचं लोकार्पण आज सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झालं. याच कार्यक्रमातून जिल्ह्यातल्या खेड, चिपळूण, संगमेश्वर आणि राजापूर या अन्य रेल्वेस्थानकांचं लोकार्पण देखील दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं. या वेळी रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, कोकण रेल्वेचे रत्नागिरी विभागीय व्यवस्थापक शैलेश बापट यांच्यासह भाजप आणि शिवसेनेचे नेते उपस्थित होते. सुशोभिकरणानंतर रेल्वेस्थानकं विमानतळांसारखी भव्य दिसत आहेत. स्थानकांमध्ये कोकण रेल्वेचे शिल्पकार मधू दंडवते यांची प्रतिमा लावण्यात आली असून, दर्शनी भागात व्हर्टिकल गार्डनही तयार करण्यात आलं आहे. चित्रांनी भिंती सजवण्यात आल्या आहेत. कोकण रेल्वेच्या एकूण ३२ रेल्वेस्थानकांचं टप्प्याटप्प्यानं सुशोभीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, पहिल्या टप्प्यात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधल्या १२ स्थानकांचा समावेश होता, असं चव्हाण यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने आपल्या दहा उमेदवारांची यादी आज जाहीर केली. यात मलकापूर, बाळापूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर मध्य, गंगापूर, कल्याण पश्चिम, हडपसर, माण, शिरोळ आणि सांगली या जागांसाठी पक्षाने उमेदवारांची घोषणा केली आहे.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महायुतीने बुथस्तरावरीलसमन्वयासाठी राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांसाठी विधानसभा समन्वयकांची नियुक्ती केली आहे. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत या समन्वयकांच्या नावांची घोषणा करण्यात आली.

विधानसभा निवडणुकांचं जागावाटप आणि उमेदवारीबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांना देण्यात आले आहेत, असं मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितलं. महायुती सरकारने मोफत सिलेंडर योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज, विविध सिंचन योजना, महिलांसाठी मोफत उच्चशिक्षण, मोफत एसटी प्रवास, दोन वर्षात सुमारे पावणे पाच लाख कोटींची परकीय गुंतवणूक अशा विकास कामांच्या जोरावर महायुती जनतेसमोर जाणार आहे, असं ते म्हणाले. महायुती बहुमताच्याही पुढचा आकडा गाठेल असा विश्वास शंभूराज देसाई यांनी व्यक्त केला.

<><><><><>

आशियाई टेबल टेनिस विजेतेपद स्पर्धेच्या महिला सांघिक प्रकारात आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. कझाकस्तानात सुरु असलेल्या या स्पर्धेत भारतीय संघाने काल उपान्त्यपूर्व फेरीत दक्षिण

कोरियाचा ३विरुद्ध २ अशा गुणफरकाने पराभव केला. पुरुष गटाच्या उपान्त्यपूर्व फेरीत आज भारताची लढत कझाकस्तानशी होईल.

<><><><>

महिलांच्या टी२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना श्रीलंकेच्या संघासोबत होणार आहे. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दक्षिण अफ्रिका आणि स्कॉटलंडच्या संघांदरम्यान खेळला जाईल. अ गटातल्या सामन्यात काल ऑस्ट्रेलियानं न्यूझीलंडवर ६० धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलिया या गटात ४ गुणांसह आघाडीवर आहे.

<><><><>

भारत आणि बांग्लादेश यांच्या पुरुष संघांमध्ये आज नवी दिल्लीत टी २० स्पर्धेतला दुसरा सामना खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघानं तीन सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना जिंकून १-० ने आघाडी घेतली आहे.

<><><><>

आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताच्या लक्ष्य सेनचा सामना डेन्मार्कच्या रासमस गेमके याच्याशी होईल. तर किरण जॉर्ज आज पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या वांग त्झू वेईशी लढत देईल. महिला एकेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधू पहिल्याच फेरीत कॅनडाच्या मिशेल लीक कडून पराभूत झाली. दरम्यान, भारताच्या आकर्षी कश्यप आणि मालविका बनसोड यांनी सोळाव्या फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेसाठीचा मुंबई संघ जाहीर झाला असून, इराणी चषक स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या क्रिकेटपटू तनुष कोटियन याला मुंबई संघात समाविष्ट करण्यात आलं आहे. २०२४-२५ च्या या स्पर्धेच्या पहिल्या दोन फेऱ्यांसाठी १६ सदस्यीय मुंबई संघातून तनुष आपलं कसब दाखवेल. स्पर्धेच्या 'एलिट ग्रुप ए' चा सामना येत्या शुक्रवारी बडोद्यातल्या कोटांबी क्रीडांगणावर होत असून मुंबई संघाची लढत बडोदा संघाशी होईल. मुंबई संघाचा कर्णधार अजिंक्य राहणे आहे.

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रातलं वायू प्रदूषण रोखणं आणि धूळ नियंत्रित करणं यासाठी मार्गदर्शक तत्त्वं जारी करण्यात आली आहेत, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी आणि प्रसंगी दंडात्मक कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांची पूर्तता करण्यासाठी समन्वय समिती गठीत करण्यात आली असून त्याची बैठक काल आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रस्थळी कार्यरत अधिकारी - कर्मचारी, पोलिस अंमलदारांनी सजग राहून वायू प्रदूषणाला कारणीभूत घटकांवर कारवाई करावी,असे निर्देश त्यांनी दिले.

ठाणे, नवी मुंबई, वसई - विरार, कल्याण - डोंबिवली, मीरा - भाईंदर या महानगरपालिकांचे आयुक्त , प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते.

**//<><><><><>//**